North Asian International Research Journal of Multidisciplinary

IRJIF IMPACT FACTOR:6.019

ISSN: 2454-2326 Vol. 6, Issue-12 December-2020

Index Copernicus Value: 58.12 Thomson Reuters ID: S-8304-2016

NAIRJC *A Peer Reviewed Refereed Journal*

DOI: 10.5949/nairjmd.2020.10.12.6

# माध्यमिक स्तरावरील पर्यावरण शिक्षणाच्या संदर्भात साने गुरूजींच्या साहित्यामधील पर्यावरण मूल्ये व विषयनिहाय पर्यावरण मूल्यांचा अभ्यास

श्रीकांत रामरावजी पर्बत

प्राचार्य

अध्यापन पदवीका प्रशिक्षण महाविद्यालय, यवतमाळ

**सार :**

पर्यावरण ही आपल्या सर्वांचा समावेश असलेली बाब असल्याने, जीवनाची सहनशीलता ज्यावर अवलंबून आहे, त्या पर्यावरणाचे मूल्य समजून घेण्यासाठी ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टिकोनातील बदल ही काळाची गरज आहे. पर्यावरण संरक्षण आणि सुधारणा हे एक असे कार्य आहे, जे जनतेच्या सहभागाशिवाय यशस्वीपणे पूर्ण होऊ शकत नाही. अशाप्रकारे, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देशभरात प्रभावीपणे पसरवण्यासाठी मोठ्या प्रयत्नांची आवश्यकता आहे, जेणेकरून प्रत्येक नागरिक पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांमध्ये सक्रिय भूमिका घेण्यास प्रवृत्त होईल. समाजाचा अविभाज्य घटक असलेल्या मुलांना आणि भावी नागरिकांचे व पर्यावरणाचे शिक्षण दिल्यामुळे तसेच त्यांच्यामध्ये यासंदर्भात जागरूकता निर्माण होण्यास मदत होऊ शकेल. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना यासंदर्भात कोणताही पूर्वग्रह नसतो आणि ते या टप्प्यावर प्रभावीपणे माहिती ग्रहण करतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्याच्यावर कुटुंबांचा व समाजाचा सर्वात शक्तिशाली प्रभाव असतो. एक राष्ट्र म्हणून पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत विकास साध्य करण्यासाठी, प्रत्येकाने सतत ज्ञान आणि कौशल्ये प्राप्त करणे आवश्यक आहे. यामाध्यमातून पर्यावरणीय आव्हाने नियंत्रित करता येऊ शकतात. या संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील पर्यावरण शिक्षणाच्या संदर्भात साने गुरजींच्या साहित्यामधील पर्यावरण मूल्ये व विषयनिहाय पर्यावरण मूल्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## प्रस्तावना :

पर्यावरणीय समस्यांनी जागतिक स्तरावर सर्व देशांचे लक्ष वेधले आहे. कोणत्याही राष्ट्राच्या शाश्वत विकासासाठी, पर्यावरणीय समस्या विचारात घेणे आवश्यक आहे. भारतातही पर्यावरणाचे प्रश्न मुख्य चिंतेचे विषय

आहेत अशा स्थितीत पर्यावरणीय शिक्षणाच्या माध्यमातून या समस्यांची सोडवणूक भावनिक स्तरावर करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986 आणि सुधारणी 1992 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीव निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. यामाध्यमातून सर्व वयोगटामधील विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये त्यांचा प्रभावी प्रचार प्रसार होऊन पर्यावरणीय बाबींच्या संदर्भात जाणिव जागृती निर्माण होऊ शकेल. याची सुरूवात विद्यार्थ्यांपासून करून पर्यावरणाच्या जाणीवेच्या संदर्भात शाळा स्तरावर सक्रीय प्रयत्न करणे काळाची गरज आहे. हे सर्व पैलू संपूर्ण शैक्षणिक प्रक्रियेत एकत्रित केले जातील. त्यानुसार शालेय शिक्षणाच्या चौकटीने उपाययोजना राबवल्या जातील. यासंदर्भात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम यामध्ये असे मत मांडले आहे की, शाळा, अभ्यासक्रमात पर्यावरणाचे संरक्षण आणि पर्यावरणाची निगा राखणे, पर्यावरणाचे प्रदूषण नियंत्रित करणे आणि उर्जेचे संवर्धन यासाठी असलेल्या विविध उपाययोजनांवर प्रकाश टाकला पाहिजे. शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, 2005 मध्ये सुध्दा विज्ञानाद्वारे पर्यावरणाचे रक्षण करण्याचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. शैक्षणिक उपलब्धी पर्यावरण वैधतेसाठी आवश्यक आहे. विज्ञान हे पर्यावरणाच्या संदर्भात, स्थानिक आणि जागतिक, स्तरावर या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आवश्यक आहे. जगात प्रवेश करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्ये नैतिक वैधतेसाठी तेवढयाच प्रमाणात आवश्यक आहेत. अभ्यासक्रम, प्रामाणिकपणा, वस्तुनिष्ठता, सहकार्य, भीती आणि पूर्वग्रहापासून मुक्तता या मूल्यांना प्रोत्साहन यामाध्यमातून प्राप्त करून देणे काळाची गरज आहे. हया बाबी विद्यार्थ्यांमध्ये जीवन आणि पर्यावरणाच्या रक्षणाची चिंता निर्माण करेल. पर्यावरण शिक्षणाच्या संदर्भात महत्वाची बाब म्हणजे पर्यावरणाबद्दल योग्य दृष्टीकोन विकसित करणे आणि अनुकूल सवयी विकसित करणे हा आहे. पर्यावरण शिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थी व तरुणांना पर्यावरणीय समस्या आणि चिंता याबद्दल परिचित करणे आणि संवेदनशील करणे, त्यांच्यामध्ये निरोगी वैयक्तिक आणि सामाजिक दृष्टीकोन तसेच पर्यावरणाबद्दलचे वर्तन विकसित करणे हा आहे. हे त्यांना वैयक्तिकरित्या आणि सामूहिकरित्या समवयस्क आणि समुदायाला एकत्र घेऊन त्याच्या टिकाऊपणासाठी कार्य सुरू करण्यास सक्षम करेल. एक आंतरविद्याशाखीय विषय म्हणून पर्यावरण शिक्षणामध्ये केवळ सामग्रीवरच भर दिला जात नाही तर जागरूकता, दृष्टीकोन आणि कौशल्यांच्या विकासावर देखील भर दिला जातो. कृतीकडे नेणारे प्रकल्प आणि उपक्रमांसह सामग्री आणि प्रक्रिया ही एक शाश्वत जग निर्माण करण्याच्या दिशेने सज्ज असणे आवश्यक आहे. त्यामुळे हे लक्षात येते की, यासाठी केवळ पुस्तकी ज्ञान देणे पुरेसे नाही, तर विद्यार्थ्यांना काही उपक्रम आणि प्रकल्पांमध्ये सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशा स्थितीत माध्यमिक स्तरावरील पर्यावरण शिक्षणाच्या संदर्भात साने गरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्ये व विषयनिहाय पर्यावरण मूल्यांचा अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

**संशोधन समस्येची निवड :**

पर्यावरण संरक्षण, संवर्धन ही आज काळाची गरज ठरली आहे. दिवसेंदिवस प्रदुषणाच्या समस्या वाढत आहेत. व या समस्या जाणून घेणे त्यावर उपाययोजना करणे, शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक केवळ जाणीव जागृती निर्माण न करता पर्यावरण जतन, संगोपन व संवर्धन कसे करावयाचे याचे ज्ञान देण्याबरोबरच पर्यावरण मूल्ये त्यांच्यात रुजविणे महत्त्वाचे आहे. माध्यमिक शालेय स्तरावर शासनाच्या नवीन धोरणानुसार (२०१६) विषयनिहाय पर्यावरण मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यात येऊन पर्यावरण रक्षणाकरिता जबाबदार नागरिक निर्माण करण्याची जबाबदारी शाळांवर सोपविण्यात आलेली आहे. त्यामुळे शालेय शिक्षकांची जबाबदारी वाढलेली आहे. अध्ययन अध्यापन होत असतांना विषयनिहाय शिक्षक अभ्यासक्रमाशी या पर्यावरण मूल्यांची सांगड कशी घालतात तसेच पर्यावरण मूल्ये रुजविण्याकरिता कोणते विशेष प्रयत्न करतात. याचा शोध घेणे संशोधकाला जसे आवश्यक वाटले तसेच मानव आणि निसर्ग याच्या अतुट नात्यावर भारतीय संस्कृतीचा पाया उभा आहे. संस्कृती जोपासक साहित्यिकांनी त्याचा अवलंबही केलेला आहे. त्यात साने गुरुजींचाही समावेश आहे. साने गुरुजींनी त्यांच्या विविधांगी साहित्यातून निसर्ग आणि मानव हे कसे परावलंबी आहेत. मानवी जीवन समृध्द होण्याकरिता पर्यावरण मूल्ये रुजविणे किती आवश्यक आहे यावर संस्कारक्षम संस्कार देणारे साने गुरुजी आपल्या साहित्यातून मांडतात म्हणून साने गुरुजींच्या साहित्यातील प्रतिबींबीत मूल्यांचा माध्यमिक स्तरावरील विषय निहाय पर्यावरण मूल्यांच्या संदर्भात कसा उपयोग करून घेता येईल व विषयनिहाय पर्यावरण मूल्यासोबतच साने गुरुजींच्या साहित्यातील मूल्यांना अनुसरुन अध्ययन अध्यापन करता येईल. विद्यार्थ्यांमध्ये विषयनिहाय पर्यावरण मूल्यांसोबत साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्ये विद्याथ्यांमध्ये रुजविण्याकरिता शिक्षक जे विविध उपक्रमांचे आयोजन करतात त्यात साने गुरुजींच्या साहित्यातील मूल्यांचा समावेश कसा करता येईल त्याचा आराखडा करण्याचे दृष्टीने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

**संशोधनाची उदिदष्टे :**

साने गुरूजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्ये व विषय निहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण मूल्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन विषयाची मर्यादा :**

प्रस्तुत संशोधन अमरावती व यवतमाळ जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीला अध्यापन करणारे शिक्षक, विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्यापुरतेच मर्यादित आहे. हे संशोधन माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण मूल्ये व साने गुरुजींच्या निवडक साहित्यातील पर्यावरण मूल्ये यांच्यापूरतेच मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधन साने गुरुजींच्या पर्यावरण मूल्यांवर आधारित वाङ

मयापुरतेच मर्यादित आहे. संशोधन हे साने गुरुजींच्या निवडक साहित्यातील पर्यावरण मूल्ये व माध्यमिक शाळेतील अभ्यासक्रमातील पर्यावरण मूल्ये यांचा संबंध पाहण्यापूरतेच मर्यादित आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. या संशोधनासाठी अमरावती विभागातील 400 माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची निवड यादृच्छिक नमूना निवड पध्दतीच्या माध्यमातून करण्यात आली. तसेच या शिक्षकांसाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी वारंवारीता व शेकडा प्रमाण या तंत्राचा वापर करण्यात आला.

**तथ्यांचे विश्लेषण :**

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात तथ्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**सारणी क्र. 1.1**

**साने गुरूजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्ये व विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण मूल्ये यांचे विवरण दर्शविणारी सारणी.**

| | विषयनिहाय पर्यावरण मूल्ये | साने गुरूजींच्या साहीत्यातील पर्यावरण मूल्ये | होय | नाही |
|---|---|---|---|---|
| 1 | पशुप्रेम | रोगराई निमूर्लन | ६६% | ३४% |
| 2 | वृक्षप्रेम | स्वच्छता | ५६% | ४४% |
| 3 | निसर्ग प्रेम | आरोग्य | ६८% | ३२% |
| 4 | सृष्टी सौंदर्य | श्रमप्रतिष्ठा | ३६% | ६४% |
| 5 | अवकाश प्रेम | मानवता दृष्टीकोन | २२% | ७८% |
| 6 | सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता | चराचर सृष्टीवर प्रेम | ६८% | ३२% |
| 7 | पर्यावरण विषयक संवेदना | भूतदया | ३६% | ६४% |
| 8 | रोगराई निर्मूलन | पर्यावरण रक्षण | ५०% | ५०% |
| 9 | भूतदया | पर्यावरण विषयक संवेदना | ५०% | ५०% |
| 10 | सौदर्यात्मकता | वृक्षप्रेम | ५६% | ४४% |
| 11 | नैसर्गिक संपत्तीचा योग्य वापर | निसर्ग प्रेम | २२% | ७८% |
| 12 | नैसर्गीक सौदर्यातून आनंदबोध | सृष्टी सौंदर्य बोध | २२% | ७८% |
| 13 | वसुंधरा प्रेम | सृष्टी प्रेम | २८% | ७२% |
| 14 | पर्यावरण सरंक्षण | अवकाश प्रेम | ३२% | ६८% |
| 15 | नैसर्गिक समतोलाची जाणीव | नैसर्गिक सौदर्यातून आनंद बोध | ३४% | ६६% |
| 16 | पर्यावरण विषयक जाणीव | पर्यावरणाबाबत जिज्ञासावृत्ती | ४८% | ५२% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 17 | पर्यावरण विषयक सामाजिक जबाबदारी | कल्पकता | ३८% | ६२% |
| 18 | पर्यावरण रक्षणाची शाश्वत विकासाची बांधिलकी | पर्यावरण विषयक सहकार्य व सहजीवन | ३२% | ६८% |
| 19 | वसुंधरा कृतज्ञता | पर्यावरण विषयक सामाजिक जबाबदारी | ४६% | ५४% |
| 20 | निसर्गातील जैविक घटकाप्रती सहानुभूती | सृष्टी कृतज्ञता | ३२% | ६८% |
| 21 | पर्यावरण विषयक जिज्ञासावृत्ती | नैसर्गिक संपत्तीचा योग्य वापर | ३०% | ७०% |
| 22 | निसर्ग तादात्म्य | पर्यावरण विषयक जाणीव | २४% | ७६% |
| 23 | जैविक व अजैविक घटक परस्परावलंबन | जैविक व अजैविक घटक परस्परावलंबन | २२% | ७८% |
| 24 | पर्यावरणाशी एकरूपता | एकरूपता | २४% | ७६% |
| 25 | पर्यावरणा विषयी आपुलकी | पर्यावरण घटकाविषयी आपुलकी | ३४% | ६६% |
| 26 | पर्यावरण विषयक सहकार्य व सहजीवन | निसर्ग तादात्म्य | ३४% | ६६% |
| 27 | श्रमप्रतिष्ठा | निसर्गाविषयी आत्मनुभूती | ३४% | ६६% |
| 28 | निसर्गाप्रती वैज्ञानिक दृष्टीकोन | पशु पक्षी प्रेम | २०% | ८०% |
| 29 | सृष्टी कृतज्ञता | निसर्गाप्रती वैज्ञानिक दृष्टीकोन | ३०% | ७०% |

साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्ये व विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण मूल्ये यासंदर्भात सर्वेक्षित शिक्षकाकडुन प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये ६६.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पशुप्रेम हे पर्यावरण मूल्य आणि साने गुरुजींच्या साहित्यामधील पर्यावरण मूल्यामध्ये तर ३४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पशुप्रेम हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्ये आहेत. ५६.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील वृक्षप्रेम हे पर्यावरण मूल्य आणि साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये आहे तर ४४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील वृक्षप्रेम हे पर्यावरण मूल्य आणि साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ६८.००% शिक्षकांच्या मते विषय निहाय अभ्यासक्रमातील निसर्गप्रेम हे पर्यावरण मूल्य आणि साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ३२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील निसर्गप्रेम हे पर्यावरण मूल्य आणि साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ३६. ००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील सृष्टी सौंदर्य हे पर्यावरण मूल्य आणि साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे तर ६४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय

अभ्यासक्रमातील सृष्टी सौंदर्य हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. २२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील अवकाश प्रेम हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ७८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील अवकाश प्रेम पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ६८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ३२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता नाही. ३६.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण विषयक संवेदना हे पर्यावरण मूल्य आणि गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ६४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण विषयक संवेदना हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ५०.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील रोगराई निर्मूलन हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ५०.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील रोगराई निर्मूलन हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ५०.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील भूतदया हे पर्यावरण मूल्य आणि साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे तर ५०.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील भूतदया हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ५६.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील सौंदर्यात्मकता है पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ४४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील सौंदर्यात्मकता हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. २२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील नैसर्गिक संपत्तीचा योग्य वापर हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ७८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील नैसर्गिक संपत्तीचा योग्य वापर हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. २२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील नैसर्गिक सौंदर्यातून आनंदबोध हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण नृल्यामध्ये समानता आहे तर ७८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील नैसर्गिक सौंदर्यातून आनंदबोध हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता नाही. २८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील वसुंधरा प्रेम हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे तर ७२. ००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील वसुंधरा प्रेम हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या

साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता नाही. ३२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण संरक्षण हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ६८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण संरक्षण हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता नाही. ३४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील नैसर्गिक समतोलाची जाणीव हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे.

तर ६६.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील नैसर्गिक समतोलाची जाणीव हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ४८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण विषयक जाणिव हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ५२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण विषयक जाणिक हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ३८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण विषयक सामाजिक जबाबदारी हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे ६२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण विषयक सामाजिक जबाबदारी हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ३२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण रक्षणाची शाश्वत विकासाची बांधिलकी हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ६८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण रक्षणाची शाश्वत विकासाची बांधिलकी हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता नाही. ४६.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील वसुंधरा कृतज्ञता है पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे तर ५४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील वसुंधरा कृतज्ञता है पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता नाही. ३२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील निसर्गातील जैविक घटकाप्रती सहानुभूती हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ६८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील निसर्गातील जैविक घटकाप्रती सहानुभूती हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ३०.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण विषयक जिज्ञासावृत्ती हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ७०.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण विषयक जिज्ञासावृत्ती हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. २४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील निसर्ग तादत्म्य व साने

गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ७६.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील निसर्ग तादात्म्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. २२.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील जैविक व अजैविक घटक परस्परावलंबन है पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे तर ७८.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील जैविक व अजैविक घटक परस्परावलंबन हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. २४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरणाशी एकरुपता है पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे तर ७६. ००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरणाशी एकरुपता है पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता नाही. ३४.००% शिक्षकांच्या मते साने विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरणाविषयी आपुलकी हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे तर ६६.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरणाविषयी आपुलकी हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता नाही. ३४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण विषयक सहकार्य व सहजीवन हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ६६.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील पर्यावरण विषयक सहकार्य व सहजीवन हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. २०.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील श्रमप्रतिष्ठा हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे तर ८०.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील श्रमप्रतिष्ठा हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ३०.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील निसर्गाप्रती वैज्ञानिक दृष्टिकोन हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य यामध्ये समानता आहे तर ७०.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील निसर्गाप्रती वैज्ञानिक दृष्टिकोन हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही. ३६.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील सृष्टी कृतज्ञता है पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता आहे तर ६४.००% शिक्षकांच्या मते विषयनिहाय अभ्यासक्रमातील सृष्टी कृतज्ञता हे पर्यावरण मूल्य व साने गुरुजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यामध्ये समानता नाही.

**निष्कर्ष** :

साने गुरूजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्ये तसेच विषय निहाय अभ्यासक्रमामधील पर्यावरण मूल्ये यामध्ये बऱ्याच प्रमाणात साम्यता दिसून येते. विषयनिहाय अभ्यासक्रमात साने गुरूजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्यांचा

अंतर्भाव केल्यास विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण मूल्यनिर्मिती परिणामकारक होण्यास मदत होऊ शकेल. विषय निहाय अभ्यासक्रमातून साने गुरूजींच्या साहित्यातील पर्यावरण मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रूजवितांना सार्वजनिक स्वच्छता, रोगराई निमूर्लन, वृक्षारोपण, पर्यावरण रक्षण, निसर्ग प्रेम, चराचर सृष्टीवर प्रेम, वैज्ञानिक दृष्टीकोन, भूतदया, मानवतावादी दृष्टीकोन आणि नैसर्गीक सौंदर्यातील आनंदबोध या मूल्यांचा उपयोग होतो.

**संदर्भ ग्रंथ सूची** :


[1].सावंत प्रकाश (2010). पर्यावरण शिक्षण. कोल्हापूर : फडके प्रकाशन

[2].शेवतेकर शारदा (2002). उपयोजित पर्यावरण शिक्षण. लातुर : सुरभारणी प्रकाशन

[3].कुळकर्णी डी. आर. (2007). पर्यावरण शिक्षण. नागपूर : विद्या प्रकाशन.

[4].बोरकर विष्णू (1997). मूल्यशिक्षणाची गुरूकिल्ली. अहमदनगर : गाज प्रकाशन प्रथम आवृत्ती

[5].सोनी रामगोपाल (1998). उदयोन्मुख भारतीय समाजमें शिक्षा के नये आयाम. आगरा : पुस्तक प्रकाशन एवं वितरक प्रकाशन

[6].साने गुरूजी (1935). शामची आई प्रारंभ. पुणे : विद्यार्थी गृह प्रकाशन.

[7].राजा मंगळवेडेकर. साने गुरूजींची जीवनगाथा. पूणे : साधना प्रकाशन.

[8].साने गुरूजी (1985). निवडक पत्री. पुणे : साधना प्रकाशन